TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार     कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र     APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : ३३ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : १२ ते १८ ऑगस्ट २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

## अजित पवारांना माझं आव्हान आहे, १७ तारखेला, अंजली दमानियांचं सूरज चव्हाणांच्या आरोपांवर प्रत्युत्तर !

**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून अंजली दमानिया व अजित पवार गटातील सूरज चव्हाण व अमोल मिटकरी यांच्यात एक्स वर रंगलेला कलगीतुरा अद्याप चालू आहे. एकीकडे अंजली दमानिया यांनी अजित पवारांना लक्ष्य केलं असताना दुसरीकडे सूरज चव्हाण व अमोल मिटकरी हे अंजली दमानियांच्या आरोपांना उत्तर देत आहेत. यामध्ये आता अंजली दमानिया यांनी अजित पवारांना आव्हान देणारी पोस्ट एक्सवर शेअर केली आहे. त्यात त्यांचे ३ वर्षांचे आयटीआर रिटर्न्स अर्थात प्राप्तीकर परतावा भरल्याचे पुरावे आणण्याचाही उल्लेख त्यांनी केला आहे. दोन दिवसांपूर्वी अंजली दमानिया यांनी अजित पवारांच्या गुलाबी बसमधील फोटोवर




खोचक पोस्ट केली होती. गुलाबी जॅकेट घालून गुलाबी गाड्या आणि बसेस फिरवून जनसन्मान होत नसतो. त्या जनतेने कष्टाने कमावलेल्या पैशातून भरलेल्या कराचा अपव्यय न करणे, भ्रष्टाचार न करणे हा जनतेचा खरा सन्मान होईल. तो तुमच्यानं या जन्मी तरी शक्य होणार नाही. केवळ गुलाबी जॅकेट घालून वाल्याचा वाल्मिकी होत नसतो, अशा शब्दांत त्यांनी अजित पवारांना लक्ष्य केलं होतं. यावर टीका करणाऱ्या सूरज चव्हाण यांनाही अंजली दमानिया यांनी लक्ष्य केलं. मिस्टर सूरज चव्हाण. तुम्ही आणि तुमचे मालक अजित पवार काय आहात ते उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे आणि मी किती तत्त्वावर जगते ते देखील पूर्ण महाराष्ट्राला माहित आहे: आणि हो, तुमच्या मालकाला देखील माहित आहे, त्यांना विचारा. दोष तुमचा नाही, तुमच्या भ्रष्ट विचारसरणीचा आहे. तत्त्वावर लोक कशी जगतात ते तुम्हाला कळणे शक्य नाही. तुमच्याबद्दल मी बोलणार नाही कारण इंग्रजीतली एक म्हण आठवली. कधीही डुकराशी कुस्ती करायची नसते. त्यामुळे तुम्ही दोघं चिखलानं माखता आणि डुकराला त्यात आनंद मिळत असतो, असा त्याचा अर्थ आहे, असं अंजली दमानिया यांनी या पोस्टमध्ये नमूद केलं होतं. दरम्यान, अजित पवार गटाचे नेते सूरज चव्हाण यांनी यावर अंजली दमानिया यांचा एकेरी उल्लेख करत प्रत्युत्तर दिलं आहे. अंजली दमानिया रीचार्जवर चालणारी बाई आहे, असं ते म्हणाले. अंजली दमानियांचं उत्पन्न काय ते त्यांनी सांगावं. वर्षातून दोन विदेशी सहली कशा होतात ? ८ तारखेला ईडीमध्ये त्यांच्या नवऱ्याच्या विरोधात तक्रार दाखल झाली आहे. त्या गोरगरीब जनतेची जमीन बिल्डरच्या घशात घालतात. माझ्याकडे सगळे पुरावे आहेत, असा आरोप सूरज चव्हाण यांनी केला आहे.

## उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावर हल्ला करणारे दिल्लीच्या अब्दालीचे लोक - संजय राऊत

**ठाणे** : शनिवारी उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्यानंतर राज्यातील राजकारण तापू लागलं आहे. या घटनेनंतर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत. शनिवारी रात्री उशीरा यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली होती. दरम्यान, आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही या घटनेवर भाष्य केलं आहे. तसेच त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही प्रत्युत्तर दिलं आहे. संजय राऊत यांनी सकाळी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांना उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर मनसेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या हल्ल्याबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, अंधाराचा फायदा घेऊन काही तरी फेकलं, अशा चुटपूट घटनामुळे आम्हाला काहीही फरक पडत नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. ठाण्यात उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावर हल्ला करणारे दिल्लीच्या अब्दालीचे लोक होते. दिल्लीच्या अब्दालीने महाराष्ट्रात मोठी सुपारी दिली आहे. त्यापैकीच ही एक सुपारी होती. बीडमध्ये मनसेच्याबाबतीत जो प्रकार घडला, त्याच्याशी ठाकरे गटाचा संबंध नव्हता, हे



आम्ही कालच स्पष्ट केली होतं. मात्र, तरीही ॲक्शनला रिॲक्शन होती, असं कुणी म्हणत असेल, तर तो त्यांचा भ्रम आहे, असं संजय राऊत म्हणाले. ठाण्यात अंधाराचा फायदा घेऊन उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावर काही वस्तू फेकण्यात आल्या. मात्र, अंधार असल्यामुळे फेकणारे वाचले. जर ते मर्द असते, तर त्यांनी समोर येऊन हल्ला केला असता, माझी शिवसेनेच्यावतीने ( ठाकरे गट) त्यांना विनंती आहे, की त्यांनी अंधाराचा फायदा घेऊन असे कृत्य करू नये, तुमच्या घरात तुमचे आईवडील, पत्नी, मुलं वाट बघत असतात, त्यांनी अशा खालच्या स्तराला जाऊ नये, दिल्लीतील अब्दालीने महाराष्ट्रात गोंधळ घालण्याची सुपारी दिली आहे. ते दिल्लीत बसून मजा बघत आहेत, असं म्हणत त्यांनी नाव न घेता, अमित शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकाही केली. पुढे बोलताना त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही प्रत्युत्तर दिलं. उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर झालेला हल्ला म्हणजे ॲक्शनवर रिॲक्शन होती, असं विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं होतं. यासंदर्भात बोलताना, अशा गोष्टींमुळे आम्हाला कोणताही फरक पडत नाही. आमचा कालचा मेळावा उत्तमपणे पार पडला. आता ठाण्यातलं वातावरण बदलत आहे. विधानसभेच्या दृष्टीने आमचं पाऊल पडते आहे. त्याला दृष्ट लावण्याचे काम दिल्लीतले अब्दालाची लोक करत आहेत. राज्यात जे काही चालले आहे, ते दिल्लीतल्या अब्दालीच्या इर्शाय़ारून चाललं आहे, हे देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांना माहिती आहे. दोन महिन्यानंतर आम्ही तुम्हाला ॲक्शनवर रिॲक्शन कशी असते, हे सांगू, असा इशाराही त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिला.

## शिंदे गटाच्या आणखी एका खासदाराच्या निवडीला आव्हान

**मुंबई** : पुणे जिल्ह्यातील मावळ लोकसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या निवडणुकीला पराभूत अपक्ष उमेदवार राजू पाटील यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. शिंदे गटाचे नवनियुक्त खासदार रवींद्र वायकर, नरेश म्हस्के यांच्या खासदारकीलाही उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून त्याबाबतच्या याचिका प्रलंबित आहेत. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मावळमधून शिंदे गटाचे उमेदवार बारणे हे ६ लाख ९२ हजार ८३२ मते घेऊन विजयी झाले होते. त्यांनी, उद्धव ठाकरे गटाचे संजोग वाघेरे यांचा पराभव करून




तिसऱ्यांदा खासदारकी मिळवली होती. या निवडणुकीत ५ लाख ९६ हजार २१७ मते मिळवणारे पराभूत अपक्ष उमेदवार वकील राजू पाटील यांनी बारणे यांचा विजयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. मतमोजणी आणि प्रचारावेळी गैरप्रकार झाल्याचा आरोप पाटील यांनी बारणे यांच्या निवडणुकीला आव्हान देणाऱ्या याचिकेत केला आहे. मावळ लोकसभेसाठी करण्यात आलेले मतदान आणि प्रत्यक्ष मतमोजणीतील आकडा यामध्ये जवळपास ५७३ मतांची तफावत आढळून आली. शिवाय, मतमोजणी सुरू असताना अनेक अनोळखी व्यक्ती मतमोजणी केंद्रावर फिरत होत्या. याविषयी रीतसर तक्रार करूनही त्याची दखल न घेतल्याने न्यायालयात याचिका केल्याचा दावा पाटील यांनी याचिकेत केला आहे. तसेच, बारणे यांनी प्रचारादरम्यान धार्मिक ध्रुवीकरण केल्याचा आरोपही याचिकेत केला असून या दाव्याच्या समर्थनार्थ पुरावे याचिकेसह जोडले आहेत. बारणे यांनी धर्माच्या नावावर मते मागितली होती.

# एनसीबीकडून ५२ कोटी रुपयांचे अमलीपदार्थ नष्ट

**मुंबई :** अमलीपदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) गेल्या काही वर्षांत मुंबई आणि आसपासच्या परिसरातून जप्त केलेले ५,४८५ किलो अमली पदार्थ शुक्रवारी नष्ट केले. नवी मुंबईतील तळोजा येथे नष्ट करण्यात आलेल्या या अमली पदार्थांची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे ५२ कोटी रुपये असल्याचे सूत्रांनी सांगितले. या अमली पदार्थांच्या तस्करी प्रकरणात अनेक आरोपींना अटक करण्यात




आली होती. त्यात परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार उच्च दर्जाचे अमली पदार्थ नष्ट करण्यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीत एनसीबीसह इतर अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या समितीने प्रकरणांचा आढावा घेऊन ८ आणि ९ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, तळोजा, महाराष्ट्र येथे अमली पदार्थांचा साठा नष्ट केला. जप्त करण्यात आलेल्या सुमारे १० किलो कोकेनचा त्यात समावेश होता. दरम्यान, यापूर्वी करण्यात आलेल्या कारवाईत अनेक परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली होती. हे अमली पदार्थ प्रामुख्याने लॅटिन अमेरिकेतून तस्करी करून भारतात आणले होते. या कारवाईदरम्यान ५२ हजार १३० खोकल्याची औषधे नष्ट करण्यात आली. या बाटल्या धारावी परिसरातून जप्त करण्यात आल्या होत्या. या कारवाईत एकूण ५,४७९ किलो अमली पदार्थांचा साठा नष्ट करण्यात आला.

# म्हाडाची अल्प गटात महागडी घरे, वरळीतील सदनिका २.६२ कोटींची; मासिक उत्पन्नाची मर्यादा ७५ हजार रुपये

**मुंबई :** म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या सप्टेंबर २०२४च्या सोडतीतील घरांच्या किमती नेहमीप्रमाणे याही वर्षी चढ्या आहेत. मात्र यावेळी अल्प गटातील घरांच्या किमतीने कोटींचा पल्ला पार केला आहे. वरळीतील अल्प गटातील घराची किंमत चक्क दोन कोटी ६२ लाख १५ हजार ५३९ रुपये आहे. महिना ७५ हजार रुपये उत्पन्न असणाऱ्यांना हे घर कसे परवडणार, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. तर मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाला मिळालेल्या घरांच्या किमती अवाच्या सवा आहेत. त्यामुळे ही घरे सर्वसामान्य विजेत्यांना परवडणारी नाहीत. मुंबई मंडळाच्या २०३० घरांच्या सोडतीसाठी शुक्रवारपासून




अर्ज विक्री -स्वीकृती प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया ४ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. तर १३ सप्टेंबरला सोडतीचा निकाल जाहीर होणार आहे. मुंबईत म्हाडाची घरे ही अत्यल्प आणि अल्प गटासाठी अत्यंत महत्त्वाची असतात. दोन्ही गटातील इच्छुक सोडतीकडे डोळे लावून होते. पण आज अर्ज विक्री - स्वीकृतीस सुरुवात झाल्यानंतर मात्र किंमत पाहूनच त्यांची मोठी निराशा झाली. वडाळा आणि इतर ठिकाणची अल्प गटातील घरेही दीड ते दोन कोटींच्या घरातील आहेत. नऊ लाख रुपये असे वार्षिक (दरमहा ७५ हजार रुपये) कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या अर्जदारांना वा पुढे विजेत्यांना ही घरे कशी परवडणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, दुरुस्ती मंडळाकडून या सोडतीसाठी शहरातील ८९ घरे उपलब्ध झाली आहेत. मागील सोडतीत ही काही घरे दुरुस्ती मंडळाकडून उपलब्ध झाली होती. त्यावेळी या घरांच्या किमती भरमसाट होत्या. ताडदेवमधील सात घरे चक्क साडेसात कोटी रुपयांची होती. ही किंमत उच्च गटालाही न परवडल्याने सातपैकी एकही घर २०२३ च्या सोडतीत विकले गेले नाही. हे घर यावेळी पुन्हा सोडतीत समाविष्ट करण्यात आले आहे. याबाबत मुंबई मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारले असता या घराच्या क्षेत्रफळानुसार घर अल्प गटात समाविष्ट झाले आहे. तर दुरुस्ती मंडळाकडून प्राप्त झालेल्या घरांच्या किमती या संबंधित ठिकाणच्या रेडीरेकनर दराच्या ११० टक्के दराने निश्चिती केली जाते. त्याप्रमाणे किंमत निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# बहिणीच्या उपचारासाठी शेअर बाजारातून मोठा नफा मिळविण्याचा प्रयत्न, पण सायबर भामट्यांनी केली फसवणूक

**मुंबई :** बहिणीच्या मुत्रपिंडाच्या आजारावर उपचार करण्यासाठी शेअर बाजारातून मोठा नफा मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलेची सायबर भामट्यांनी सुमारे ११.५० लाख रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कांदिवली पोलिसांनी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या फसवणुकीमुळे आजारी बहिणीने स्वत: साठवलेले पैसेही गेले. ४८ वर्षांची तक्रारदार महिला कांदिवली येथे राहत असून तिच्या लहान बहिणीच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या आहेत. त्यामुळे ती तिच्या आजारी बहिणीची विशेष काळजी घेते. मार्च महिन्यांत तिला समाज माध्यमांवर रोबो टेडिंगसंदर्भातील एक जाहिरात दिसली होती. शेअर खरेदीसह ट्रेडिंगमधील गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळत असल्याची जाहिरात पाहून या महिलेला बहिणीच्या उपचारासाठी आशेचा किरण दिसला. त्या जाहिरातीमध्ये तीन मोबाइल क्रमांक होते. त्यामुळे तिने संबंधित मोबाइलवर संपर्क साधला. यावेळी समोरील व्यक्तीने तिचा विश्वास संपादन करताना तिला शेअरमध्ये गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला. तसेच तिला चांगला परतावा मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे तिने बहिणीबरोबर चर्चा करून शेअरमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर




या दोघींनी शेअरमध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. मार्च ते जुलै २०२४ या कालावधीत तिने ३ लाख २० हजार, तर तिच्या बहिणीने ८ लाख २० हजार रुपये असे एकूण ११ लाख ४० हजार रुपये शेअरमध्ये गुंतवले. ही रक्कम या दोघींनी संबंधित व्यक्तीने दिलेल्या बँक खात्यात हस्तांतरित केली होती. मात्र दिलेल्या मुदतीत त्यांनी त्यांना परताव्याची रक्कम पाठविली नाही. त्यामुळे तिने संबंधित व्यक्तींकडे चॅटद्वारे याबाबत विचारणा केली. मात्र त्यांच्याकडून तिला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी त्यांचे मोबाइल घेणे बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच या महिलेने कांदिवली पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर तिने तीन मोबाइल क्रमांक पोलिसांना दिले आणि संबंधितांविरोधात तक्रार केली. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर अज्ञात आरोपींविरोधात पोलिसांनी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यांचा कांदिवली पोलीस ठाण्यातील सायबर सेलचे अधिकारी तपास करीत आहेत.

# महिलेची ४४ लाखांची सायबर फसवणूक

**मुंबई :** शेअर्सच्या खरेदी-विक्रीतून नफा मिळून देण्याचे आमिष दाखवून ३९ वर्षीय महिलेची ४४ लाख रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. फसवणूक झालेल्या महिलेचे पती राष्ट्रीयकृत बँकेत व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत. फेसबुकवरून




आरोपी महिलेच्या संपर्कात आले. त्यानंतर त्यांनी तिची फसवणूक केली. याप्रकरणी सायबर पोलीस अधिक तपास करीत आहेत. आरोपी महिलेला शेअर बाजारातून चांगला नफा मिळून देण्याच्या नावाखाली जम्बिन नावाचे पि डाऊनलोड करण्यास सांगण्यात आले होते. तिला सुरुवातीला चांगला नफाही होत असल्याचे दिसून येत होते. या महिलेने ५६ व्यवहाराद्वारे ४३ लाख ८७ हजार रुपये आरोपींनी सांगितलेल्या बँक खात्यात हस्तांतरित केले. तिला ॲप्लिकेशनमध्ये रक्कम जमा झालेली दिसली. त्यानंतर तिने रक्कम काढण्याचा प्रयत्न केला. परंतु महिलेला ती काढता आली नाही. त्यामुळे आपली सायबर फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आले. तिने याप्रकरणी मध्य प्रादेशिक सायबर पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# अपहृत मुलाचा अवघ्या काही तासांत शोध घेण्यात पोलिसांना यश

**मुंबई :** गोवंडीमधील शिवाजी नगर परिसरातील एका अडीच वर्षाच्या मुलाचे गुरुवारी सायंकाळी एका अज्ञात व्यक्तीने अपहरण केले होते. मात्र गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अवघ्या काही तासांमध्ये तपास करून या मुलाचा शोध घेतला असून सध्या या मुलाला पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. गोवंडीमधील शिवाजी नगर परिसरातील बैंगनवाडी येथे हा अडीच वर्षाचा मुलगा आई -वडिलांसोबत राहत असून गुरुवारी सायंकाळी तो घराबाहेर खेळत असताना अचानक



गायब झाला. त्याच्या आई - वडिलांनी परिसरात त्याचा बराच वेळ शोध घेतला. मात्र तो सापडला नाही. अखेर रात्री उशिरा त्यांनी शिवाजी नगर पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. याप्रकरणी गुन्हे शाखा परिमंडळ ६ समांतर तपास करीत होते. पोलिसांनी परिसरातील शेकडो सीसी टीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रण तपासले. मात्र मुलाचा शोध लागला नाही. अखेर एका महिलेला याच परिसरात लहान मुलगा सापडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी या महिलेचा शोध घेतला. या महिलेकडे सदर मुलगा सापडला. पोलिसांनी या महिलेची चौकशी केली असता येथील एका मस्जिदीजवळ हा मुलगा सापडल्याचे तिने सांगितले. या मुलाच्या आई, वडिलांचा बराच वेळ शोध घेतला. मात्र कोणीही या मुलाला ओळखत नव्हते. त्यामुळे मुलाला घरी घेऊन आल्याची माहिती तिने पोलिसांनी दिली. पोलिसांनी या मुलाला ताब्यात घेऊन त्याच्या आई-वडिलांच्या स्वाधीन केले. दरम्यान, या मुलाचे अपहरण झाल्याचा संशय असून हा मुलगा मशिदीपर्यंत कसा पोहोचला याचा तपास पोलीस करीत आहेत.

# सीएसएमटी स्थानकात आरडीएक्स ठेवणार असल्याची धमकी, पोलीस यंत्रणा सतर्क

**मुंबई:** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसमध्ये (सीएसएमटी) आरडीएक्स ठेवणार असल्याचा धमकीचा फोन मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला आला. त्या घटनेनंतर सर्व यंत्रणांना सतर्क करण्यात आले असून याप्रकरणी दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला शुक्रवारी सायंकाळी ७ च्या सुमारास हा दूरध्वनी आला होता. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने काही वेळातच सीएसएमटी रेल्वे स्थानकावर आरडीएक्स ठेवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ याबाबतची माहिती रेल्वे पोलिसांना दिली. घटनास्थळी श्वान पथके व इतर यंत्रणा पाठवून तपासणी करण्यात आली. पण काही संशयास्पद सापडलेले नाही. याप्रकरणी दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू आहे. दक्षिण मुंबईतील प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलमध्ये दहशतवादी हल्ला होणार असल्याचा दूरध्वनी मध्य प्रदेशातील एका मनोरुग्णाने केल्याचे नुकतेच उघड झाले होते. पोलिसांना सुरक्षा, बंदोबस्त, तपास कामांसह बॉम्ब व दहशतवादी हल्ल्यांच्या खोट्या दूरध्वनी व अफवांनाही समोरे जावे लागत आहे. मुंबई पोलिसांना दर महिन्याला सरासरी ५ ते ७ खोटी माहिती देणारे दूरध्वनी अथवा संदेश



येत आहेत. गेल्या सात महिन्यांत मुंबई पोलिसांना सुमारे ३५ अफवा अथवा धमकीचे दूरध्वनी अथवा संदेश प्राप्त झाले आहेत. त्यामुळे तपासासोबत सुरक्षा यंत्रणांना अशा अफवांशीही दोन हात करावे लागतात. मुंबई पोलिसांना दूरध्वनी, ई-मेल आणि समाज माध्यमांवर बॉम्ब अथवा दहशतवादी हल्ल्याबाबत माहिती मिळाल्यानंतर कार्यपद्धतीनुसार तात्काळ संबंधित यंत्रणांना याबाबतची माहिती दिली जाते. त्यासाठी घटनास्थळावर श्वान पथक, बॉम्ब शोध व नाशक पथक पाठवण्यात येते. तसेच त्या ठिकाणी बंदोबस्तही ठेवावा लागतो. तपासणीत काहीही संशयास्पद सापडले नाही, तर दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेतला जातो. गुन्हे शाखेचे गुप्तवार्ता विभाग विशेष करून अशा व्यक्तींचा तपास करते, असे अधिकाऱ्याने सांगितले. गेल्यावर्षीही अफवांचे सुमारे १०० दूरध्वनी मुंबई पोलिसांना आले होते. यावर्षी जुलै महिन्यापर्यंत ३५ दूरध्वनी मुंबई पोलिसांना प्राप्त झाले आहेत. उद्योगपती मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी यांच्या लग्नात बॉम्ब असल्याचे ट्वीट करणाऱ्याला नुकतीच मुंबई पोलिसांनी गुजरातमधून अटक केली. हे ट्वीट १३ जुलैला करण्यात आले होते. दरम्यान, सुरक्षेबाबत योग्य ती काळजी घेण्यात आली होती. याप्रकरणी विरल आसरा याला अटक करण्यात आली होती. तो खासगी कंपनीत कामाला आहे. आरोपी आयटी इंजिनीयर होता. तर १३ मेला एका व्यक्तीने मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला दूरध्वनी करून असलम अली कराची, पाकिस्तानमधून ३५० किलो आरडीएक्स घेऊन मुंबईत आला आहे. तो महालक्ष्मी, विमानतळ आणि इतर रेल्वे स्थानाकांवर आरडीएक्स ठेवणार असल्याचे दूरध्वनी करणाऱ्याने सांगितले. हा दूरध्वनीही खोटा होता.

# पालिकेत अपुरे मनुष्यबळ, सचिव विभागात निम्म्याहून अधिक लिपिक पदे रिक्त




**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या सचिव विभागात लिपिकांची ६८ पैकी तब्बल ५५ पदे रिक्त असून सध्यस्थितीत केवळ १३ लिपिक कार्यरत आहेत. अनेक वर्षे उलटल्यानंतरही महानगरपालिका प्रशासनाला लिपिक पदावरील भरतीसाठी मुहूर्त मिळालेला नाही. या विभागातील लिपिकांना बढती मिळाली असून विभागात पुरेसे लिपिक नसल्याने बढती मिळालेल्या अनेकांना लिपिक म्हणूनच काम करावे लागत आहे. तसेच, अपुऱ्या मनुष्यबळामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण पडत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष धगधगत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेच्या सचिव विभागात लिपिक पदाची भरती प्रक्रिया झालेली नाही. सचिव कार्यालयातील जवळपास ४९ लिपिकांनी पदोन्नतीसाठी २०२२ मध्ये परीक्षा दिली. त्या परीक्षेत एकूण ३१ लिपिक उत्तीर्ण झाले. विविध निकष आणि कौशल्याच्या आधारे त्यांची कनिष्ठ, वरिष्ठ सचिवीय सहाय्यक या पदावर पदोन्ती झाली. सचिव कार्यालयात लिपिक पदाची एकूण ६८ पदे आहेत. त्यापैकी तब्बल ५५ पदे रिक्त आहेत. कार्यालयातील ३१ लिपिकांना वरिष्ठ सचिवीय सहा-यक, तर २४ लिपिकांना कनिष्ठ सचिवीय सहा-यक या पदावर पदोन्नती मिळाली आहे. मात्र, कार्यालयात पुरेसे लिपिक उपलब्ध नसल्याने पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ पदावरील काम करावे लागत आहे. पदोन्नती मिळूनही पदभार हाती न आल्याने कर्मचाऱ्यांचे मनोबल खचले आहे. तसेच, या कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येत आहे. पालिकेच्या सचिव विभागातील अनागोंदी कारभारामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. पालिकेत आता प्रशासकीय राजवट असल्यामुळे पालिकेतील विविध समितींच्या बैठका होत नाहीत. मात्र, पालिका निवडणुकीनंतर प्रशासकीय राजवट हटविण्यात आली, तर उपलब्ध लिपिकांवर कामाचा प्रचंड ताण येण्याची शक्यता आहे. तसेच, कर्मचाऱ्यांच्या बदलीसंदर्भातील प्रक्रिया सुरू असून आयुक्तांची परवानगी मिळताच तात्काळ बदली केली जाईल, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. महानगरपालिकेच्या सचिव विभागात लिपिक पदासाठी शेवटची भरती २०१५ साली तत्कालीन महानगरपालिका सचिव नारायण पठाडे यांच्या कार्यकाळात करण्यात आली होती. एकूण १२ जागांसाठी त्यावेळी जाहिरात काढण्यात आली होती. त्यावेळी कनिष्ठ सचिवीय सहा-यक (मराठी) संवर्गात एकूण ३६ पदे होती. त्यापैकी एकूण २९ पदे रिक्त होती. दरम्यान, कनिष्ठ सचिवीय सहा-यक संवर्गातील २९ रिक्त पदे लिपिक संवर्गात रूपांतरित करण्यात आली. त्यानंतर १२ व २९ अशी मिळून एकूण ४१ लिपिक पदे त्यावेळी भरण्यात आली होती.


# वसईत १२ ऐवजी ७ उड्डाणपूल होणार, सर्वेक्षणानंतर रचनेत बदल, ३ पूल एकमेकांना जोडणार



**वसई :** शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ उड्डाणपुलांच्या रचनेत आता बदल करण्यात आला आहे. सलग वाहतूक करता यावी यासाठी १२ पैकी ३ उड्डाणपूल एकमेकांना जोडण्यात येणार असून उर्वरित २ उड्डाणपूल आता रेल्वे उड्डाणपुलात रुपांतरीत केले जाणार आहे. यामुळे १२ उड्डाणपुलांऐवजी शहरात ७ उड्डाणपूल होणार आहेत. वसई विरार शहराची लोकसंख्या वाढत असून नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. शहरातील रस्ते अरुंद असून त्यावर वाहनांची संख्या वाढत आहे. त्यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शहरात अंतर्गत वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी १२ उड्डाणपुलांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. पहिला प्रस्ताव २०१४-१५ मध्ये देण्यात आला होता. तेव्हा या १२ उड्डाणपुलांसाठी अडीचशे कोटींचा खर्च अपेक्षित होता. नुकतीच एमएमआरडीएने शहरातील विस्तारीत पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्ते आणि उड्डाणपुलांसाठी २ हजार ३२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानुसार एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी वसई विरारमध्ये भेट देऊन या उड्डापुलांच्या कामाची पाहणी केली. त्यावेळी १२ प्रस्तावित उड्डाणपुलांच्या रचनेत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उड्डाणपुलांमध्ये माणिकपूर नाका, बाभोळा नाका, वसंत नगरी, रेंज ऑफीस, (वसईत) पाटणकर पार्क, लक्ष्मी शॉपिंग सेंटर, चंदन नाका (नालासोपारा) बोळींज खारोडी नाका, सायन्स गार्डन, फुलपाडा, मनवेलपाडा, नारिंगी (विरार) अशा १२ उड्डापुलांचा समावेश होता. मात्र सर्वेक्षणानंतर एकाच रस्त्यावर दोन पूल असल्याने ते एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार विरारचा खारोडी नाका बोळींज-सायन्स गार्डन उड्डाणपूल आणि मनवेल पाडा- फुलपडा हे उड्डाणपूल एकमेकांना जोडले जाणार आहे. तर वसईतील माणिकपूर नाका आणि बाभोळा पूल एकमेकांना जोडले जाणार आहे. नालासोपारामधील लक्ष्मी शॉपिंग सेंटर जंक्शन आणि श्रीप्रस्थ पाटणकर पार्क येथील प्रस्तावित उड्डाणपूल रेल्वे उड्डाणपुलात रुपांतरीत केले जाणार आहे. त्यामुळे पुलांची संख्या १२ वरून ७ होणार आहे. वाहनचालकांच्या सोयींसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे वाहनचालकांना सलग प्रवास करता येईल आणि प्रवास अधिक सुखकर होईल, अशी माहिती वसई विरार महापालिकेचे कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे यांनी दिली. उड्डाणपुलांचे ठिकाण (लोकेशन) तेच आहे मात्र संख्या कमी झाली आहे. नव्या रचनेमुळे अंदाजित खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

# झोपडीवासीयांचे भाडे थकवणारा विकासक काळ्या यादीत, गुन्हाही दाखल !

**मुंबई :** झोपडीवासीयांचे अनेक महिन्यांचे भाडे थकविणाऱ्या विकासकांविरुद्ध न्यायालयाच्या दणक्यानंतर कारवाई करणाऱ्या झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने आता अधिक कठोर होत कांदिवली पश्चिम येथील एका झोपु योजनेतील विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या विकासकाला काळ्या यादीत टाकण्यात आले असून घर विक्रीलाही प्रतिबंध करण्यात आला आहे. भाडे थकबाकीसंदर्भात झोपु प्राधिकरणाकडून पहिल्यांदाच अशी कारवाई करण्यात आल्यामुळे विकासकांमध्ये खळबळ माजली आहे. भाडे थकविणाऱ्या विकासकांविरुद्ध प्राधिकरणाने आतापर्यंत घरविक्रीला स्थगिती देण्याची कारवाई केली होती. त्यानंतरही विकासकांकडून भाडे अदा केले जात नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे आता प्राधिकरणाने कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. झोपडीवासीयांना दोन वर्षांचे आगावू भाडे व त्या पुढील वर्षाचे धनादेश देणे बंधनकारक केले आहे. अन्यथा काळ्या यादीत टाकण्यात येईल, असे स्पष्ट केले होते. परंतु आता प्राधिकरणाने थेट विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कांदिवली पश्चिम येथील साई श्रद्धा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेला २०१२ मध्ये मंजुरी मिळाली होती. या योजनेला



२०१५ मध्ये इरादा पत्र देण्यात आले. या योजनेत सुरुवातीला मे. पूजा डेव्हलपर्स होते. २०२१ मध्ये मे. सी.जी हौसिंग इन्फ्रा प्रा. लि. यांची विकासक म्हणून नियुक्ती झाली. झोपडीवासीय आणि खुल्या विक्रीतील घरांची ही २३ मजली संयुक्त इमारत असून ए विंगमध्ये पुनर्वसनातील तर बी विंगमध्ये विक्री घटकातील सदनिका प्रस्तावीत करण्यात आले आहेत. ए विंगमधील काही मजले विक्री घटकासाठी देण्यात आले आहेत. गेले १८ महिने भाडे थकित असल्याच्या अनेक तक्रारी प्राधिकरणाकडे आल्या होत्या. याशिवाय पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम अनेक वर्षांपासून बंद असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे सदर विकासकाला संपूर्ण भाडे अदा करीत नाही तो पर्यंत विक्री घटकातील बांधकामांना ऑक्टोबर २०२३ मध्ये स्थगिती देण्यात आली होती. याबाबत स्मरणपत्रेही देण्यात आली. तरीही विकासकाकडून पुनर्वसनाचे काम पूर्ण करण्याऐवजी विक्री घटकातील सदनिकांचे काम पूर्ण करण्यावर भर देण्यात आला होता. त्यामुळे अखेर प्राधिकरणाने विकासकाला दणका देण्यासाठी त्याला काळ्या यादीत टाकण्याबरोबरच गुन्हा दाखल करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले. त्यानुसार प्राधिकरणाने मे. सी. जी. हौसिंग प्रा. लि. चे चंद्रेश गाला यांच्यावर गुन्हा दाखल केला. भाडे थकविणे आणि पुनर्वसनातील सदनिकांचे काम पूर्ण न केल्याबद्दल फसवणूक आणि विश्वासघात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महारेरा तसेच नोंदणी महानिरीक्षकांनाही कळविण्यात आले असून खरेदीदारांनी या प्रकल्पात घरखरेदी करू नये, असे आवाहन प्राधिकरणाने केले आहे.

# पालघर जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजना संथ, ६७ हजार लाभार्थी वंचित

**वसई :** मोठा गाजावाजा करून सुरू करण्यात आलेली पंतप्रधान आवास योजना पालघर जिल्ह्यात संथगतीने सुरू असल्याचे आढळून आले आहे. जिल्ह्यातील ७७ हजार घरे मंजूर असली तरी केवळ साडेनऊ हजार घरेच तयार आहेत. पंतप्रधान आवास योजना एकूण ४ घटकांमध्ये राबविण्यात येते. घटक अ मध्ये झोपडपट्टी पुनर्विकास करणे, घटक ब मध्ये कर्ज आणि व्याज अनुदान स्वरुपात घरांची निर्मिती करणे, घटक क मध्ये खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे. आणि घटक ४डट मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी घर बांधण्यासाठी अनुदान देणे अशा योजनांचा समावेश आहे. मात्र पालघर जिल्ह्यामध्ये पंतप्रधान आवास योजना संथगतीने सुरू असल्याचे आढळून आले आहे. पालघर जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेतून मंजूर झालेली घरे आणि प्रत्यक्षातील काम, आवश्यक निधी याबाबतचा तपशील खासदार हेमंत सावरा यांनी मागविल्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. पालघर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २९ लाख ९५ हजार ४२८ आहे. जिल्ह्यात जव्हार,



मोखाडा, तलासरी, वसई, विक्रमगड, पालघर, डहाणू आणि वाडा असे आठ तालुके आहेत. १००७ गावे आणि ४६७ ग्रामपंचायती या जिल्ह्यात आहेत. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पालघर जिल्ह्यात ७७ हजार ६८ घरांचा प्रस्ताव होता. मात्र त्यातील ९ हजार ५५५ घरे पूर्ण झाली आहेत. अद्यापही ६७ हजार ५१३ लाभार्थी योजनेतील घरापासून वंचित आहेत. आदिवासी जिल्हा असूनही येथील नागरिकांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने शासकीय यंत्रणेची उदासीनता दिसून आली आहे. पालघर जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे लागू नसल्याबद्दल खासदार डॉ हेमंत सवरा यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात त्यांनी ८ तालुकानिहाय तपशील मागवला आहे. सावरा यांनी केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांना पत्र पाठवून जिल्ह्यात योजना प्रभावीपणे राबविण्याची मागणी केली. सर्व लाभार्थ्यांना लवकरात लवकर घरे मिळावी यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र व राज्य सरकारच्या संबंधित यंत्रणांची समन्वय बैठक घेऊन तालुकानिहाय अधिकाधिक निवासस्थाने कशी मंजूर करता येतील, असे त्यांनी सांगितले. वसईच्या स्मार्ट सिटी संकुलात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे देण्यासाठी सोडत योजना सुरू केली आहे. पात्र लाभार्थ्यांना अनुदानाअंतर्गत घरे देण्यासाठी सोडत काढली जाणार आहे, अशी माहिती सुरक्षा व्यवस्थापन सदस्य जश पंचमिया यांनी सांगितली.

# भाईंदर मधील मीठ विभागाच्या जागेवरील शौचालय ताब्यात घेण्यासाठी ४ कोटीचा खर्च




**भाईंदर :** भाईंदर पश्चिम येथील मीठ विभागाच्या जागेवर असलेल्या जुन्या शौचालयच्या देखभाल- दुरुस्तीसाठी ते ताब्यात घेण्याचा निर्णय महालिकेने घेतला आहे. यासाठी जवळपास ४ हजार ७१२ चौरस मीटर इतके क्षेत्र खरेदी करण्यासाठी ४ कोटी १६ लाख इतका खर्च अपेक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे या खर्चास मान्यता देणारा प्रशासकीय ठराव महापालिकेकडून नुकताच मंजुर केला आहे. भाईंदर पश्चिम परिसरात भाईंदर, राई,मोर्वा आणि मुर्धा अशी जुनी गावे आहेत.या गावातील लोकसंख्या पाहता ग्रामपंचायत तसेच नगरपरिषद कालावधीपासून येथील मीठ विभागाच्या जागेवर सार्वजनिक शौचालये उभारण्यात आली आहेत.कालांतराने या शौचालयाच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी ही मिरा भाईंदर महानगरपालिकेवर आली आहे.मात्र काही वर्षापूर्वीच वन आणि मीठ विभागाच्या जागेवर महापालिकेमार्फत कोणतेही विकास काम करण्यास सक्त बंधन असल्याचे आदेश शासनाने प्रसिद्ध केले आहेत. परिणामी अशा या जुन्या शौचालयाचा प्रश्न निर्माण झाला आहे.यावर उपाय म्हणून शौचाल्यासाठी बाधित झालेले क्षेत्र थेट बाजारभावा प्रमाणे खरेदी करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यानुसार या गावातील एकूण ६२ शौचालयांचे सर्वेक्षण करून सुमारे ४ हजार ७१२ इतकी जागा घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तर यासाठी ४ कोटी १६ लाख ८५ हजार २०९ इतक्या खर्च अपेक्षित असल्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर करण्यात आला आहे.यास महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी १८ जुलै २०२४ रोजी मान्यता देत असलेला प्रशासकीय ठराव मंजुर केला आहे.

मिरा भाईंदर शहरात मीठ विभागाची मोठी जागा आहे. यामुळे उत्तन-भाईंदर मुख्य रस्ता, जंजिरे धारावी किल्ला विकास,क्रिकेट स्टेडियम,आणि इतर आरक्षित भूखंडाचा विकास करण्याचे काम रखडले आहे.मध्यंतरी या जागा बाजारभावाने खरेदी करून त्या ताब्यात घेण्याचा पर्याय केंद्र शासनाने महापालिकेला सुचवला आहे.मात्र महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता इतके पैसे उभे करणे आताच्या घडीला अशक्य असल्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येते.

# आरटीई प्रवेश मोफत तरी, इतर उपक्रमाच्या नावाखाली शाळांकडून पैसे उकळण्याचे काम सुरु; पालक आक्रमक

**ठाणे :** आरटीई अंतर्गत निवड झालेले विद्यार्थ्यांची कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर पालक जेव्हा शाळेत प्रवेश घेण्यास जात आहेत. तेव्हा शाळा प्रशासनाकडून पालकांकडे शाळेतील इतर उपक्रमांच्या नावाखाली पैशांची मागणी केली जात आहे. हे पैसे भरले नाही तर, शाळेत विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही, असे पालकांना सांगण्यात येत आहे. त्यामुळे पालक आक्रमक झाले असून त्यांनी शिक्षणअधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. यावर शिक्षण विभाग कारवाई करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नवी मुंबई शहरातील आरटीई प्रवेशित बालकांचे पालक एकत्रित येत त्यांनी नवी मुंबई महापालिका शिक्षण अधिकारी यांना पत्र लिहिले आहे. शैक्षणिक वर्षे २०२४-२५ या वर्षाची आरटीई कायद्याअंतर्गत होणाऱ्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया सुरु आहेत. ठाणे जिल्ह्यातून आरटीईसाठी ६४३ शाळा पात्र झाल्या असून ११ हजार ३३९ जागांसाठी ही प्रक्रिया पार पडत आहे. या जागांसाठी ठाणे जिल्ह्यातून विविध भागातून १९ हजार ५६८ अर्ज प्राप्त झाले होते. यातून पहिल्या यादीत ९ हजार ५९७ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. या विद्यार्थ्यांची




प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया सध्या सर्वत्र सुरु आहे. कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यावर ज्या शाळेत आपल्या पाल्याची निवड झाली आहे, त्या शाळेत प्रवेश निश्चित करण्यासाठी पालक जाताच, त्यांच्याकडे क्रीडा, नृत्य, गायन, साहसी खेळ, सहल अशा विविध उपक्रमांची एकत्रित शुल्क भरण्यास सक्ती केली जात आहे. या उपक्रमांसाठी ठाणे जिल्ह्यातील काही शाळांमध्ये १० हजार तर, काही शाळांमध्ये १५ ते २० हजार रुपये शुल्क आकारले जात आहे. शिवाय पालकांनी हे शुल्क भरल्यानंतर त्यांना कोणतीही पावती दिली जात नसल्याची माहिती उघडकीस आली आहे. तसेच हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने आकारले जात नसून रोख रक्कम भरण्यास पालकांना सांगितले जात आहे. त्यामुळे या खासगी शाळा बेकायदेशिर रित्या आरटीईच्या विद्यार्थ्यांकडून पैसे उकाळत असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. शिक्षणाचा मूलभूत अधिकार हा फक्त कागदावरच मोफत राहिला आहे.

आरटीईमध्ये विद्यार्थ्यांची निवड होऊन सुद्धा शाळांचा मनमानी कारभार सुरु आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत इतर उपक्रमाच्या नावाखाली पालकांकडून पैसे उकळण्याचे काम सुरु आहे. अशा मुजोर शाळांची प्रशासनाने मान्यता रद्द केली पाहिजे -प्रकाश दिलपाक, शिक्षण आरोग्य अधिकार मंच, नवी मुंबई

**पालक प्रतिक्रिया**

मी दिव्यांग असून माझे वार्षिक उत्पन्न १ लाखाहून कमी आहे. त्यामुळे मी माझ्या मुलाचे शिक्षण आरटीई अंतर्गत पूर्ण करण्याचे ठरविले. त्याची आरटीई प्रक्रियेअंतर्गत शाळेत निवड झाली आहे. परंतू, शाळेत प्रवेश घेण्यासाठी गेलो असताना, माझ्याकडून इतर उपक्रमांसाठी २५ हजार रुपये शुल्क भरण्यास सांगितले. शिक्षण विभागाने याकडे लक्ष द्यावे. -सुबोध सांबरे, पालक, नवी मुंबई

आरटीई प्रक्रियेअंतर्गत नवी मुंबईतील एका शाळेत माझ्या मुलाची निवड झाली आहे. परंतू, या शाळेत इतर उपक्रमासाठी १५ हजार रुपयांची मागणी केली जात आहे. यासंदर्भात, शिक्षण विभागाला तक्रार करुनही त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याची प्रतिक्रिया नवी मुंबई शहरातील एका पालकांनी व्यक्त केली.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी ग्रामीण भागातील एका खासगी शाळेत माझ्या मुलीची निवड झाली आहे. शाळेत मी प्रवेश निश्चित करण्यासाठी गेलो. त्यावेळी मला इतर उपक्रमांसाठी १० हजार रुपये भरण्यास सांगितले. यामध्ये पुस्तकांचे, सहलीचे तसेच इतर उपक्रमांचा समावेश असेल असं शाळेकडून मला सांगण्यात आले. त्यांच्याकडे मी शुल्क दिल्यानंतर पावतीची विचारना केली असता, त्यांनी आम्ही पावती देत नाही असे सांगितले, अशी प्रतिक्रिया भिवंडीतील एका पालकाने दिली.

# मैत्रिणीची हत्या केल्यानंतर स्वत: खाडीत उडी घेऊन आत्महत्या, युवकाचा मृतदेह सापडला

नवी मुंबई : **मैत्रिणीचा गळा** आवळून हत्या केल्यानंतर स्वत: खाडीत उडी घेऊन आत्महत्या केलेल्या युवकाचा मृतदेह शुक्रवारी सकाळी सापडला. त्याने एनआरआय खाडीत उडी घेतली होती, तर त्याचा मृतदेह बेलापूरच्या खाडीत सापडला. मृतदेह ताब्यात घेत वैद्यकीय तपासणीसाठी प्रथम संदर्भ रुग्णालयात पाठवला आहे. स्वस्तिक पाटील असे त्या युवकाचे नाव असून त्यानेच आत्महत्येपूर्वी त्याच्या मैत्रिणीचा गळा आवळून हत्या केल्याचा संशय आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोघांचा परिचय सुमारे दोन वर्षांपूर्वी



समाजमाध्यमातून झाला होता. परिचयाचे रूपांतर गाढ मैत्रीत झाले. मात्र मे महिन्यापासून काही वाद झाले आणि दोघांचे भेटणे-बोलणे कमी झाले. गेल्या काही आठवड्यांपासून पुन्हा दोघे भेटू-बोलू लागले. मंगळवार आणि बुधवार दोघेही पूर्णवेळ एकत्र होते. युवतीची महाविद्यालय अंतर्गत परीक्षा बुधवारी होती. पेपर झाल्यानंतर दोघे पुन्हा भेटले व एनआरआय जेट्टी परिसरात गेले. त्याच ठिकाणी दोघांचा वाद झाला असावा आणि रागाच्या भरात स्वस्तिकने मैत्रिणीचा गळा आवळून तिची हत्या केली आणि त्यानंतर जेट्टी पुलावरून उडी घेत आत्महत्या केली. त्याने उडी घेताना काही मच्छीमारांनी पाहिले. त्याला वाचवण्यासाठी प्रयत्न केले, मात्र ओहोटीमुळे त्याला शोधण्यात अपयश आले. पोलिसांनीही अग्निशमन दलाची मदत घेत त्याला शोधण्याचे प्रयत्न केले होते. या युवकाचा मृतदेह शोधण्याची मोहीम बुधवारपासून सुरू होती. अखेर शुक्रवारी सकाळी बेलापूर खाडीत त्याचा मृतदेह सापडला असून त्याच्या नातेवाईकाकडून ओळख पटली आहे, अशी माहिती साहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांनी दिली.

# बिबट्याच्या कातड्याची विक्री करण्यास आलेल्या व्यक्तीला अटक

**मुंबई :** बिबट्याच्या कातडीची विक्री करण्यासाठी आलेल्या ५५ वर्षीय व्यक्तीला गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी गुरूवारी रात्री कुर्ला परिसरातून अटक केली. आरोपीच्या ताब्यातून बिबट्याची कातडी हस्तगत करण्यात आली असून त्याबाबत गुन्हे शाखा कक्ष -५ तपास करीत आहे. गणेश रहाटे (४४) असे अटक आरोपीचे नाव असून तो प्रभादेवी परिसरातील रहिवासी आहे. गुन्हे शाखा कक्ष-५ चे प्रभारी अधिकारी घन:श्याम नायर यांना एक संशयीत व्यक्ती कुर्ला विद्याविहार येथे बिबट्याचे कातडे विकण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी तेथे सापळा रचला होता. त्यावेळी एक संशयीत व्यक्ती तेथे आला. संशयावरून त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्या बॅगेत एक प्राण्याचे कातडे आढळले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत माहिती देण्यात आली. वनविभागाच्या अधिकार्यांनी पाहणी केली असता ते कातडे बिबट्याचे असल्याचे निष्पन्नझाले. त्यानुसार वन्यजीव संरक्षक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपी रहाटेला गुन्हे शाखेने अटक केली. आरोपीकडून १७८ सेमी लांब व ४१ सेमी रुंद कातडी जप्त करण्यात आले असून या बिबट्याची शिकार कोठे करण्यात आली, त्यात कोणकोण सहभागी होते, याबाबत गुन्हे शाखा तपास करीत आहे.




# डोंबिवलीतील कुख्यात एमडी किंग अटकेत

**ठाणे :** डोंबिवली येथे एमडी हे अमली पदार्थ विक्री करणाऱ्या प्रवीण चौधरी उर्फ एमडी किंग (५४) याला त्याच्या साथिदारांसह ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून २१ लाख ३० हजार रुपये किमतीचे एमडी हे अमली पदार्थ जप्त केले आहे. पोलिसांना गुंगारा देण्यासाठी तो एमडी पावडर रिक्षामधून विक्री करत असे. त्यांनी हे अमली पदार्थ कोठून आणले याचा तपास पोलीस करत आहेत. डोंबिवली येथील कुंभारखान पाडा येथे प्रवीण चव्हाण (४२) याला मार्चमध्ये ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली होती. त्यावेळी त्याच्याकडे १४ लाख ३० हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. त्याने हे अमली पदार्थ कोठून विकत घेतले. याबाबत चौकशी केली असता, प्रवीण चौधरी याचे नाव समोर आले. प्रवीण चौधरी हा स्वत:ला एमडी किंग म्हणवून घेत असे. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून प्रवीण चौधरी, विनोद पटवा (३१) आणि व्यंकटा नरसिम्हा देवरा (३५) यांना ताब्यात घेतले. प्रवीण याची झडती घेतली असता, त्याच्याकडून सात लाख रुपयांचे एमडी हे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. प्रवीण हा अमली पदार्थ विक्रीसाठी रिक्षाचा वापर करत होता. हे अमली पदार्थ तो रात्रीच्या वेळेत विक्री करत असे. तसेच प्रत्येक अर्ध्या तासाने तो ठिकाण बदलत असे. त्यामुळे त्याचा शोध घेणे कठीण जात होते. प्रवीण चौधरी याला यापूर्वी देखील पोलिसांनी अटक केली होती. जामीनावर सुटल्यानंतर त्याने पुन्हा डोंबिवली शहरात एमडी आणि गांजा विक्री करण्यास सुरूवात केली होती अशी माहिती तपासात समोर आली आहे. याप्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# वक्फ सुधारणा पुढे न्या

ब्रिटिश काळापासूनच नव्हे, तर मुघलांची सत्ता येण्यापूर्वीचाही इतिहास असणारी वक्फ ही एक इस्लाम समाजातील व्यवस्था आहे. समाजाच्या कल्याणासाठी संपत्तीचे दान किंवा विनियोग म्हणजे वक्फ. ही मूळ संकल्पना इस्लामच्या स्थापनेपासूनच चालत आली आहे. ती मुळात उदात्त आहे आणि सगळ्यांच धर्मांमध्ये दानसंकल्पना असते व आहे. ब्रिटिशांचे राज्य असताना वक्फमध्ये दान दिलेल्या दोन गावांचा वाद थेट लंडनमध्ये प्रिव्ही कौन्सिलपर्यंत गेला. हा अनुभव जमेस धरून इंग्रजांनी भारतात या साऱ्या प्रक्रियेला कायद्याची चौकट देण्याचा प्रयत्न केला. मग पहिला वक्फ कायदा भारतात अस्तित्वात आला. आता केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या सुधारणा या पहिल्या नाहीत. आधीही अनेकदा झाल्या आहेत. मात्र, प्रस्तावित सुधारणा योग्य आहेत का, हाही प्रश्न आहे. यामुळेच, केंद्र सरकारने या विधेयकाचा मसुदा संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेतला आणि तो स्वागतार्ह आहे. या विषयाचे राजकारण न होता तो मार्गी लागणे तसेच आधुनिक राज्यव्यवस्था, कायदे आणि समाजरचना यांच्याशी सुसंगत होणे, अतिशय आवश्यक आहे. मुस्लिम समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने सन २००५मध्ये न्या. राजिंदरसिंह सचर समिती नेमली होती. या समितीने महत्त्वाच्या शिफारसी केल्या. त्यातल्या काही वक्फ व्यवस्थापनाशीही संबंधित होत्या. या शिफारसींचा समावेश मोदी सरकारने नव्या विधेयकात कसा आणि किती केला आहे, हे तपासून पाहण्याची संधी संयुक्त संसदीय समितीला मिळेल. भारतात केंद्रीय वक्फ बोर्ड आहे. त्याचप्रमाणे, सध्या २८ राज्यांमध्ये वक्फ मंडळे आहेत. देशातल्या सगळ्या वक्फ मंडळांकडे मिळून आठ लाख ७० हजार छोट्या–मोठ्या मालमत्ता आहेत, असे काही अहवाल सांगतात. या ना त्या प्रकारे वक्फ बोर्डांचा संबंध असणारी देशातील एकूण जमीन नऊ लाख ४० हजार एकर आहे. भारतासारख्या जमिनीची टंचाई निर्माण होणाऱ्या देशात ही जमीन प्रचंड असून ती भारतीय संरक्षण खाते आणि भारतीय रेल्वे यांच्या खालोखाल आहे. म्हणजे, सगळी वक्फ मंडळे मिळून देशातील तिसऱ्या क्रमाकांचे जमीन मालक किंवा वहिवाटदार आहेत. ही प्रचंड जमीन आज उत्पादक स्थितीत आहे का आणि तिचा विनियोग मुस्लिम तसेच इतर समाजाच्या हितासाठी होतो का, असा प्रश्न आहे. गेल्या काही वर्षांमध्ये विविध उच्च न्यायालये तसेच सर्वोच्च न्यायालय यांच्या समोर शंभराहून अधिक याचिका आल्या आहेत. या सर्व याचिका विविध वक्फ बोर्डांबद्दल तक्रारी करणाऱ्या आहेत, तशाच नव्या व्यवस्थेची मागणी करणाऱ्याही आहेत. मुख्य म्हणजे, यातील अनेक याचिका मुस्लिम समाजातील लोकहितवादी संस्था व संघटनांनी केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर देशातील सर्व वक्फ मंडळांचा कारभार पारदर्शक होण्यासाठी, त्यांच्याकडील मालमत्तांचा समाजहितासाठी विनियोग होण्यासाठी नवा कायदा अत्यंत आवश्यक आहे. हे काम अनेक वर्षे रखडले. ते आता लवकरात लवकर व्हावे. धर्माशी निगडीत कोणतीही व्यवस्था, यंत्रणा किंवा परंपरा असली की तिला सरकारने किंवा राज्यव्यवस्थेने हात लावू नये, ही अपेक्षा अनेक शतके चालत आली आहे. यातूनच भारतात काही ठिकाणी फकीर समाज आणि राजे, संस्थानिक असाही संघर्ष उभा राहिला होता. मात्र, भारताने जी आधुनिक राज्यव्यवस्था, न्यायप्रणाली आणि लोकशाही स्वीकारली आहे; तीत जिथे जिथे सार्वजनिक बाबींचा संबंध येतो, तिथे कोणत्याही धर्माच्या परंपरांना दु-यम स्थान मिळायला हवे. देशातील वक्फ मालमत्तांमधून सध्याच्या बाजारभावानुसार संपत्तीची निर्मिती होते का, आणि ती अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येते का, अशी एक पाहणी झाली होती. तिचे निष्कर्ष धक्कादायक होते. देशातील इतकी प्रचंड जमीन व मालमत्ता जर समाजहितासाठी इष्टतम प्रमाणात वापरली जात नसेल तर सरकारने तेथे खंबीर हस्तक्षेप करणे आवश्यकच आहे. मोदी सरकारने याबाबत विरोधकांशी चर्चा करून या प्रकरणात एकमत कसे होईल, यासाठी वेगाने पावले टाकावीत. काँग्रेससहित इतर विरोधी पक्षांनीही आपली राजकारणाची जुनी पद्धत सोडून या विषयाकडे आधुनिक आणि खऱ्याखुऱ्या धर्मनिरपेक्ष नजरेने पाहण्याची आवश्यकता आहे. वक्फ बोर्डांचे व्यवस्थापन आणि सर्वसामान्य मुस्लिम समाजाचे कल्याण यांचा अन्योन्य संबंध उरला आहे का, असा प्रश्न नव्या कायद्याच्या विरोधकांनी स्वत:लाच विचारायला हवा. तसेच, केंद्र सरकारनेही या विषयाचे रूपांतर आपले समर्थक विषारी व धार्मिक प्रचारात करणार नाहीत, याची काळजी घ्यावी. भारतात सगळ्या राष्ट्रीय परिचर्चा जुन्याच पोपटपंचीत नेण्याची खोड सगळ्यांना लागली आहे. त्यातून सुटका झाली तरच हे समाज सुधारणेचे पाऊल पुढे पडेल.

# एमपीएससी मंत्र : भारतीय अर्थव्यवस्था -गट ब अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा

गट क सेवा मुख्य परीक्षेच्या पेपर दोनमधील अर्थव्यवस्था व नियोजन, विकासविषयक अर्थशास्त्र घटकाच्या तयारीबाबत या व पुढील लेखांमध्ये चर्चा करण्यात येत आहे. या घटकातील संकल्पनात्मक भागाच्या तयारीबाबत या लेखामध्ये पाहू. अर्थव्यवस्था विषयाच्या संकल्पना व संज्ञा व्यवस्थित समजून घेणे आवश्यक आहे. या विषयाच्या संकल्पना परस्परांशी घनिष्टपणे संबंधित असतात. त्यामुळे तुलनात्मक अभ्यासाने हा विषय सोपा होऊ शकतो. मूलभूत संकल्पना आणि व्याख्या समजणे या विषयाच्या तयारीसाठीची अट आहे. या तयारीसाठी शभडइ ची १० वी १२ वी ची अर्थव्यवस्थेची पाठ्यपुस्तके अभ्यासणे आवश्यक आहे. घटकनिहाय तयारी पुढीलप्रमाणे करता येईल.



**समग्रलक्षी अर्थशास्त्र वृद्धी व विकास:**

राष्ट्रीय उत्पन्न संकल्पना, स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पादन, स्थूल मूल्यवर्धन, स्थूल देशांतर्गत उत्पादन भाजक या संकल्पना उदाहरणांसहित समजून घ्यायला हव्यात. या संकल्पनांचा तुलनात्मक अभ्यास करणे विषय समजून घेण्यासाठी जास्त फायद्याचे ठरते.

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती, भारतातील राष्ट्रीय उत्पन्न मापन, त्यातील समस्या, व्यापारचक्रे यांचा कालानुक्रमे अभ्यास करणे व्यवहार्य ठरते. समस्यांची कारणे, स्वरूप, परिणाम, उपाय अशा मुद्द्यांच्या आधारे अभ्यास करावा.

रोजगाराची संकल्पना समजून घेऊन तिचा भारतीय अर्थव्यवस्थेमधील संबंधित मुद्द्यांबरोबरच अभ्यास करणे व्यवहार्य आहे.

राष्ट्रीय उत्पन्न, ते मोजण्याच्या पद्धती, साधने, चलनवाढ आणि महागाईबाबतचे सिद्धांत, कारणे, परिणाम, उपाय यांचा अभ्यास पुस्तकांमधून करावा.

**सार्वजनिक वित्त**

बाजार अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक वित्ताची / आयव्ययाची भूमिका (बाजार अपयश व विकासानुकूलता)– सार्वजनिक गुंतवणुकीचे निकष, गुणवस्तू व सार्वजनिक वस्तू या संकल्पना समजून घेऊन त्यांचा परस्परसंबंध लक्षात घ्यावा. तुलनात्मक पद्धतीने या मुद्द्यांचा अभ्यास करणे परिणामकारक ठरते.

सार्वजनिक वित्त घटकामध्ये अर्थसंकल्प हा मुद्दा मध्यवर्ती ठेवून संबंधित सर्व संकल्पना समजून घेतल्यास अवघड किंवा बोजड वाटणार नाहीत. अर्थसंकल्पाचे प्रकार, त्याच्या मंजुरीची प्रक्रिया, महसूल, महसुलाचे स्रोत– (केंद्रीय व राज्यस्तरीय) कर रचना कर सुधारणांचे समीक्षण-मूल्यवर्धित कर - वस्तू व सेवा कर या संकल्पना नीट समजून घ्यायला हव्यात.

अंदाजपत्रकीय, राजकोषीय, वित्तीय तुटी इत्यादी तुटीचे प्रकार, त्यांचे स्वरूप, त्यांची कारणे, परिणाम, उपाय या संकल्पना व्यवस्थित समजून घ्यायला हव्यात. पण त्या बरोबरच याबाबतच्या चालू घडामोडी अथात याबाबतचे शासकीय तसेच फइकचे निर्णय, आकडेवारी माहीत असायला हवी.

सार्वजनिक खर्चाचे (केंद्रीय व राज्यस्तरीय) प्रकार, यांतील घटक, त्यांचे प्रमाण, त्यांचे स्वरूप, त्यांच्या वृद्धीची कारणे, परिणाम, समस्या, उपाय, सार्वजनिक खर्च सुधारणेसाठीचे प्रयत्न असे मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.

सार्वजनिक कर्जाचे प्रकार यांतील घटक, त्यांचे प्रमाण, त्यांचे स्वरूप, त्यांच्या वृद्धीची कारणे, परिणाम, समस्या, उपाय असे मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.

भारतातील वित आयोग, राज्यांच्या केंद्राकडून असलेल्या समस्या, भारतातील वित्तीय सुधारणा हे मुद्दे पारंपरिक आणि गतिमान अशा दोन्ही बाजूंनी महत्त्वाचे आहेत. त्यांचा परिपूर्ण अभ्यास आवश्यक आहे. मूलभूत मुद्दे समजून घेऊन याबाबतच्या चालू घडामोडींची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

सार्वजनिक वित्त आणि वित्तीय संस्था या उपघटकाचा अभ्यास त्यामध्ये नमूद प्रत्येक मुद्दा मूलभूतपणे समजून घेऊन करणे आवश्यक आहे. याबाबत संकल्पनात्मक आणि विश्लेषणात्मक प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. तसेच हा भाग नियमितपणे अपडेट करण्याची आवश्यकता आहे. आर्थिक पाहणी अहवालामध्ये याबाबत होणारी चर्चा, नवे मुद्दे, संकल्पना व्यवस्थित समजून घेणे आवश्यक आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय भांडवल:**

वृद्धीचे इंजिन स्वरुपात आंतरराष्ट्रीय व्यापार हा मुद्दा आंतरराष्ट्रीय व्यापाराचे अर्थव्यवस्थेतील वृद्धीमधील महत्त्व/ योगदान आणि वृद्धीतील परकीय भांडवल व तंत्रज्ञानाची भूमिका अशा अर्थाने अभ्यासावा.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे अभिजात व आधुनिक सिद्धांत हे सिद्धांत तुलनात्मक टेबलमध्ये नोट्स काढून उदाहरणांच्या आधारे अभ्यासले तर समजणे व लक्षात ठेवणे सोपे होईल.

आंतरराष्ट्रीय वित्तपोषण संस्था आणी क्षेत्रीय व्यापार करार यांचा अभ्यास पुढील मुद्द्यांच्या आधारे करावा:

स्थापनेमागील हेतू, उद्दीष्टे, स्थापनेचे वर्ष, भारत सदस्य आहे का ? असल्यास भारताची यांमधील भूमिका, त्यांचे आंतरराष्ट्रीय व भारतासाठीचे योगदान

जागतिक व्यापार संघटनेची आंतरराष्ट्रीय व्यापार व गुंतवणुकीमधील भूमिका, तिचे नियम, याबाबत उद्भवणारे मुद्दे, व चालू घडामोडी पहायला हव्यात. या अनुषंगानेच व्यापारविषयक बौद्धिक संपदा आणि व्यापारविषयक गुंतवणूक उपाय हे मुद्दे अभ्यासावेत.

# अपंगांच्या राखीव लोकल डब्यातून प्रवास करणाऱ्या सामान्य प्रवाशांवर डोंबिवली पोलिसांची कारवाई

**डोंबिवली** : लोकलमधील अपंगांच्या विशेष राखीव डब्यातून प्रवास करणाऱ्या सात सामान्य प्रवाशांवर गुरुवारी डोंबिवली लोहमार्ग पोलीस आणि रेल्वे सुरक्षा बळाच्या पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई केली. या प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ही तपासणी मोहीम यापुढे सुरूच राहणार आहे, असे डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे यांनी सांगितले. लोकलच्या वाढत्या गर्दीला कंटाळून अलीकडे अनेक सामान्य प्रवासी गर्दीच्या वेळेत तिकीट तपासणीस येत नाहीत. या संधीचा गैरफायदा घेऊन अपंगांच्या डब्यातून प्रवास करतात. अपंगांच्या डब्यातील सामान्य प्रवाशांची गर्दी वाढू लागल्याने अपंगांना बसण्यास किंवा डब्यात उभे राहण्यास जागा मिळत नाही. अनेक प्रवासी छत्रपती



शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, घाटकोपर भागातून अपंगांच्या डब्यातून प्रवास करतात. त्यामुळे ठाणे पुढील रेल्वे स्थानकातील अपंगांना अपंगांच्या डब्यातील सामान्य प्रवाशांच्या गर्दीमुळे चढता येत नाही. बदलापूर, टिटवाळा, डोंबिवली, कल्याण भागातील अनेक अपंग नोकरी, व्यवसायासाठी मुंबई परिसरात जातात. काही असाध्य व्याधी असणारे रुग्ण याच डब्यातून मुंबईचा प्रवास करून मुंबईतील रुग्णालयांमध्ये जातात. त्यांनाही अपंगांच्या डब्यात अलीकडे जागा मिळत नाही. लोकल मधील अपंगांच्या डब्यातील सामान्य प्रवाशांच्या वाढत्या गर्दीमुळे, होणाऱ्या त्रासामुळे अनेक अपंग प्रवाशांनी डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या होत्या. दिवा, डोंबिवली, कल्याण रेल्वे स्थानकात उतरणारे अनेक सामान्य प्रवासी अपंगांच्या डब्यातून प्रवास करतात, अशा तक्रारी होत्या. या तक्रारींची दखल घेऊन डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे, रेल्वे सुरक्षा बळाचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर यांनी गुरूवारी डोंबिवली रेल्वे स्थानकात मुंबईकडून येणाऱ्या आणि जाणाऱ्या लोकल डब्यांमधील अपंगांच्या डब्यांमधील प्रवाशांची शोध मोहीम राबवली. त्यावेळी या तपासणी पथकाला सात सामान्य प्रवासी अपंगांच्या डब्यातून प्रवास करत असल्याचे आढळून आले. पोलीस पथकाने त्यांना तात्काळ अपंगांच्या डब्यातून उतरवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. गुरुवारपासून सुरू असलेल्या या कारवाईमुळे सामान्य प्रवासी अपंगांच्या डब्यातून प्रवास करण्याचे टाळत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. सामान्य प्रवाशांनी अपंगांसाठी राखीव डब्यातून प्रवास करू नये असे आवाहन उंदरे यांनी केले आहे.

## उधारीवर सिगारेट दिली नाही म्हणून टपरी वाल्याची हत्या

**ठाणे** : उधारीवर सिगारेट दिली नाही म्हणून टपरी वाल्याची हत्या केल्याचा प्रकार ठाण्यातील आझाद नगर परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात




आला असून पोलिसांनी अनिकेत लक्ष्मण गायकवाड (२४) आणि सलमान फुरखान अन्सारी (२१) या दोघांना अटक केली आहे. अनिकेत आणि सलमान हे दोघे रविवारी सोमवारी सायंकाळी आझाद नगर परिसरात असलेल्या विष्णू मनोहर कोटीकवार (५४) यांच्या टपरी वर गेले होते. त्या दोघांनी विष्णू यांच्याकडे उधारीवर सिगारेट मागितली. परंतु, विष्णु यांनी उधारीवर सिगारेट देणार नाही असे सांगितले. त्यावर संतप्त झालेल्या अनिकेत आणि सलमानने विष्णु यांना टपरीच्या बाहेर घेऊन मारहाण केली. त्या मारहाणीत विष्णु यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## कल्याण रेतीबंदरमध्ये बेकायदा इमारतीमधील घरांची विक्रीकरून १० जणांची फसवणूक

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी रेतीबंदर भागातील कल्याण डोंबिवली पालिकेच्या बेघरांसाठी घरे, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या राखीव भूखंडावर भूमाफियांनी पालिकेच्या बनावट बांधकाम परवानग्या तयार करून युसुफ हाईट्स ही १० माळ्याची बेकायदा इमारत उभारली. ही बेकायदा इमारत अधिकृत, पालिकेच्या परवानगीने बांधली आहे असे १० घर खरेदीदारांनी खोटे सांगून त्यांची घर खरेदीच्या माध्यमातून एक कोटी ८२ लाख रूपयांची फसवणूक केली आहे. सन २०१२ ते मार्च २०२४ या कालावधीत या बेकायदा इमारतीची उभारणी करून यामधील घर खरेदीदारांना भूमाफियांनी विक्री केल्या आहेत. सलमान अनिस डोलारे, फराज मैहमूद हारे आणि इतर अशी भूमाफियांची नावे आहेत. कल्याण डोंबिवली पालिकेच्या दुर्गाडी रेतीबंदर भागातील बेघरांसाठी घरे या आरक्षण क्रमांक ९७ वरील ३७६ चौरस मीटरच्या राखीव भूखंडावर, ११५ चौरस मीटरच्या आरक्षण क्रमांक ९८ वरील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर युसूफ हाईट्स ही बेकायदा इमारत उभारण्यात आली आहे. दहा माळ्याची ही बेकायदा इमारत उभारण्यासाठी भूमाफियांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या बनावट बांधकाम परवानग्या, बनावट स्वाक्षऱ्या, खोटे शिक्के वापरले. महसूल विभागाची बनावट अकृषिक परवानगी तयार करण्यात आली. बनावट भोगवटा प्रमाणपत्रे तयार करण्यात आले. ही सर्व कागदपत्रे खरी आहेत असे दाखवून भूमाफियांनी या बेकायदा इमारतीची मागील १४ वर्षाच्या कालावधीत उभारणी केली. मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर दुर्गाडी रेतीबंदर भागात युसुफ हाईट्स इमारत आहे. या इमारत घर खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना आरोपींनी ही इमारत अधिकृत आहे. पालिकेच्या परवानग्या या इमारतीला आहेत असे सांगितले. या बोलण्यावर विश्वास ठेऊन १० घर खरेदीदारांनी युसुफ हाईट्स इमारतीत कर्ज काढून घरे खरेदी केली. युसुफ हाईट्स इमारत बेकायदा आहे हे समजल्यावर एका रहिवाशाच्या तक्रारीवरून बाजारपेठ पोलीस ठाण्यात भूमाफियांविरुध्द घर खरेदीदार, शासनाची फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल केला आहे. ठाणे आर्थिक गुन्हे शाखेचे साहा-यक पोलीस निरीक्षक के. एस. सय्यद याप्रकरणाचा तपास करत आहेत.

## ५ किलो गांजा व ४८०० कोडीनच्या बाटल्या जप्त, सहा जणांना अटक


**मुंबई** : अमली पदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) केलेल्या कारवाईत ७५ किलो गांजा व ४८०० कोडीनच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. याप्रकरणामागे आंतरराज्यीय टोळीचा सहभाग असून याप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. जप्त



अंमली पदार्थांची किंमत पावणे दोन कोटी रुपये आहे. उल्हासनगर परिसरात कोडीनच्या बाटल्यांची तस्करी होत असल्याची माहिती एनसीबीला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत ४ हजार ८०० कोडीनच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी विनोद पी. याला अटक करण्यात आली. आरोपीचे साथीदार मनीष पी., आकाश पी., राज के., मोहनीश एस. आणि सनी जे. यांना भिवंडी परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या वाहनात ७५ किलो गांजा सापडला. याशिवाय अमली पदार्थांच्या विक्रीतून जमा केलेले रोख एक लाख १८ हजार रुपयेही हस्तगत करण्यात आले. याप्रकरणी अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वसईत आणखी एका महिलेचा बळी, मद्यधुंद टेम्पो चालकाने महिलेचा चिरडले

**वसई** : रुग्णालयात असलेल्या आपल्या आजारी आईला भेटून घरी परतणाऱ्या एका महिलेचा टेम्पोने दिलेल्या धडकेत मृत्यू झाला आहे. मेलबा मायकल बेन्स ( ४० ) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. नायगाव पश्चिमेच्या उमेळा फाटा येथे शुक्रवारी सकाळी ही घटना घडली. टेम्पोचालक मद्याच्या नशेत असल्याने त्याचे नियंत्रण सुटून हा अपघात घडल्याचे पोलिसांनी सांगितले. मेलबा बेन्स या नायगाव पूर्वेच्या सिटीझन बेझी इमारतीत राहत होत्या. त्यांची आई वसईच्या बंगली येथील कार्डीनल रुग्णालयात उपचार घेत आहे. शुक्रवारी सकाळी मेलबा या रुग्णालयात असलेल्या आईला भेटण्यासाठी जात होत्या. सकाळी साडेनऊ च्या सुमारास नायगाव पश्चिम उमेळा फाटा रस्त्यावर समोरून भरधाव वेगाने



येणाऱ्या टेम्पोने त्यांना धडक दिली. यात मेलबा गंभीर जखमी झाली होत्या. त्यांना स्थानिकांनी कार्डिनल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. नागरिकांनी टेम्पो चालक श्याम बाबू पांडे (५०) याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याने मद्यपान केल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले आहे. त्याच्याविरोधात कलम १०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक राजू माने यांनी दिली आहे.आरोपीला शनिवारी वसई सत्र न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. यापूर्वी विरार येथे मद्याच्या नशेत भरधाव वेगाने जाणाऱ्या फॉर्च्युनर गाडीने धडक दिल्याने विवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापिका आत्मजा कासाट यांचा मृत्यू झाला होता. वाहन चालकांच्या बेदरकारपणामुळे सर्वसामान्य नागरिकांचे अपघातात जीव जात असल्यामुळे वसई संताप व्यक्त होत आहे.

# महिलांनी दीड हजारात विकले जायचे की नाही, हे ठरवावे - उद्धव ठाकरे

**ठाणे** : लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून १५०० रुपयांची लाच देऊन हे सरकार तुम्हाला विकत घेऊ पाहत आहेत. पण आपण विकले जायचे की नाही, हे महिलांनी ठरवावे, असा सल्ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी ठाण्यातील सभेत बोलताना दिला. राज्य लुटणाऱ्या दरोडेखोरांना सत्ता आल्यावर तुरुंगात पाठविणार असल्याचा इशाराही देत विधानसभेची निवडणूकित आपली लढाई महाराष्ट्र द्रेष्टेबरोबर होणार असल्याचे त्यांनी सांगितले. ठाणे येथील गडकरी रंगायतन नाट्यगृहामध्ये उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा शनिवारी पार पडली. पक्षाच्या भगवा सप्ताह निमित्ताने ही सभा आयोजित करण्यात आली होती. कितीही पैसे दिले तरी तुमची भीक आम्हाला नको हे महिलांनी आता ठरवायला हवे कारण पंधराशे रुपयांची लाच देऊन हे तुम्हाला विकत घेऊ पाहत आहे आणि महाराष्ट्राला लुटायला आले आहेत त्यामुळे आपण विकले जायचे की नाही हे ठरवायला हवे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. शिंदे सरकार केवळ घोषणा देत आहेत पण, अंमलबजावणीचा दुष्काळ आहे. त्यामुळे घोषणा देऊन निवडणूक जिंकता येत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. पैसे देऊन भाज्या विकत घेता येतात पण, मते विकत घेता येत नाही. लोकसभेत विजय दिसत नाही म्हणून त्यांनी लबाडी केली. मुंबईत ४८ मतांनी आपला पराभव होऊ शकत नाही, त्यामुळे कीर्तिकर यांची जागा चोरली, असा आरोपही त्यांनी केला. तीन महिने थांबा, तुमच्या मित्रपरिवाराचा घोटाळा उघडा केल्याशिवाय राहणार नाही तसेच तुमचे आणि सरकारी



कलेक्टर यांना तुरुंगात गज बघायला पाठवू, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. राज्याचे मंत्रालय मुंबईत हवे की अहमदाबाद की दिल्लीतून हवे आहे, अशी विचारणा करत मुख्यमंत्री शिंदे यांचा उल्लेख दुतोंडी मांडूळ असा केला. संजय राऊत हे नमक हराम २ चित्रपट काढणार असून त्याची आम्हाला उत्सुकता आहे, असेही ते म्हणाले. तू राहशील नाही तर मी राहील, असा पुनरुच्चार करत तू म्हणजे राज्य लुटणारे आणि त्याचे पाय चालणार मांडूळ असेही ते म्हणाले. नोव्हेंबर महिन्यात निवडणूक घ्यायचे मनसुबे सुरू आहेत. जेणेकरून लाडकी योजनेचे तीन ते चार महिन्याचे पैसे महिलांना मिळतील. परंतु हे फसवा फसवीचे धंदे आहेत. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही अशीच योजना आणली होती, असे सांगत त्याचे उदाहरणही त्यांनी यावेळी दिले. भगवा झेंड्यावर चिन्ह नको, कारण शिवाजी महाराजांचा एकच भगवा झेंडा आहे. अपात्रतेचा निकाल लागेल तेव्हा लागेल, परंतु निवडणूका आल्यामुळे मशाल चिन्ह घरोघरी पोहचवा. लोकशाहीची हत्या करणाऱ्याची बुड जळणारी ही मशाल आहे, असेही ते म्हणाले. तुमच्या पोराबाळांना उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत पाठवले, असे सांगत आम्ही दिल्ली तुमची कबर खोदायला गेलो होतो, असा टोला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी ठाण्यातील सभेत बोलताना केला. ठाणे शिवसेनेचे, चोरांचे नाही, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली. काल नागपंचमी झाली, यादिवशी नागाला दुध पाजतात. तसेच उद्धव ठाकरे यांनी ठाण्यातील सापाला दूध पाजले. लोकसभेत शेपट्या वळवळल्या. पण, विधानसभेत आम्ही त्यांचे फने ठेचून काढल्याशिवाय राहणार नाही, असेही ते म्हणाले. लवकरच नमक हराम २ सिनेमा काढून ठाण्यातील हरामखोरांवर प्रकाश टाकणारा आहे. निष्ठवंत आनंद दिघे यांच्या नावाने ठाणे ओळखले जायचे पण, गद्दारांनी ठाण्याचे नाव माती मिळवले. गद्दारांनी लबाडी करून निवडणूक जिंकली, अशी टीकाही त्यांनी केली. ठाकरे गटाच्या उपनेत्या अनिता बिर्जे यांनी शनिवारी रात्री टेंभी नाका येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. शिवसेनेतील फुटी नंतर अनिता बिर्जे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ दिली होती. त्यांना पक्षप्रवेश देऊन शिंदे यांनी ठाकरे गटाला मोठा धक्का दिला आहे.

# कसारा रेल्वे स्थानकात मोटरमन केबिनमध्ये चित्रफित तयार करणारे नाशिकचे दोन तरूण अटकेत

**कल्याण** : मध्य रेल्वेच्या कसारा रेल्वे स्थानकात कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून समाज माध्यमांवर प्रसारित करण्यासाठी चित्रफित तयार करणाऱ्या नाशिक येथील दोन तरूणांना रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी अटक केली आहे. राजा हिम्मत येरवाल (२०), रितेश हिरालाल जाधव (१८) अशी अटक आरोपींची नावे आहेत. ते दोघेही नाशिक येथील रहिवासी आहेत. गेल्या दहा दिवसापूर्वी कसारा रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक चारवर उभ्या असलेल्या कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये बेकायदा घुसून आरोपी राजा आणि रितेश यांनी एक चित्रफित तयार केली होती. या चित्रफितीमध्ये ते मोटरमन असल्यासारखे आणि तेथील यंत्रणेची हाताळणी करत होते. ही चित्रफित




या तरूणांनी समाज माध्यमांवर प्रसारित केली होती. लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून ही चित्रफित तयार करण्यात आल्याने रेल्वेच्या सायबर सुरक्षा विभागाने समाज माध्यमांतील या चित्रफितीच्या अनुषंगाने आरोपींचा तपास सुरू केला होता. रेल्वे स्थानकांमधील सीसीटीव्ही चित्रण, इतर तांत्रिक माहितीच्या आधारे रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी या दोन्ही तरूणांची ओळख पटवली. ते नाशिक येथील रहिवासी असल्याचे समजले. रेल्वे सुरक्षा बळ आणि स्थानिक पोलिसांनी नाशिकमध्ये या तरूणांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली. हे दोन्ही तरूण नाशिकमधून अटक केले. या तरूणांनी कसारा रेल्वे स्थानकातील कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून बेकायदा चित्रफित तयार केल्याची कबुली रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांना दिली. पोलिसांनी त्यांच्या दोषारोप ठेऊन त्यांना अटक केली. असाच प्रकार यापूर्वी गुलजार शेख याने करून रेल्वे रुळाशी छेडछाड केली होती. त्यालाही अटक करण्यात आली आहे. रेल्वेच्या आवारात, लोकलमध्ये कोणीही गैरकृत्य करत असेल तर त्याने १३९ किंवा ९००४४१०७३५ वर संपर्क साधण्याचे आवाहन रेल्वे सुरक्षा जवानांनी केले आहे.

# भाईंदर पोलिसांवर प्राणघातक हल्ला, आरोपीचा अजय चौबेचा कारागृहात मृत्यू

**भाईंदर** : भाईंदर मध्ये पोलिसांवर उकळते पाणी टाकून प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या अजय चौबे (६०) या आरोपीचा ठाण्याच्या कारागृहात मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात ५ पोलीस जखमी झाले होते. भाईंदरच्या गीता नगरमध्ये वालचंद प्लाझा या इमारतीत प्रतिभा तांबडे यांची एक सदनिका आहे. ती त्यांनी अजय चौबे याला भाडेतत्वार दिली होती. चौबे नियमित भाडे देत नव्हता तसेच मुदत संपल्यावर त्याने घरावर कब्जा केला होता आणि घरमालक महिलेला मारहाण केली होती. ३१ जुलै रोजी भाईंदर पोलिसांचे एक पथक या प्रकरणाचा पंचनामा करण्यासाठी चौबे यांच्या घरी गेले होते. मात्र चौबे दांपत्य आणि त्यांच्या मुलांनी पोलिसांवर उकळते पाणी, सिलेंडर तसेच लोखंडी सळीने हल्ला केला



होता. यात सहाय्यक पोलीस निरीक्षक अनंत गायकवाड यांच्यासह हवलदार दीपक इथापे, किरण पवार, शिपाई रवी वाघ, शिपाई सलमान पटवे आणि पंच विजय सोनी जखमी झाले होते. त्यामुळे या प्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करून पोलिसांनी अजय चौबे, त्याचा मुलगा अभय आणि पत्नी अनिता यांना अटक केली होती. त्यानुसार ७ ऑगस्ट पर्यंत पोलिस कोठडी पूर्ण झाल्यानंतर त्यांना ठाण्याच्या मध्यवर्ती कारागृहात आणण्यात आले होते. दरम्यान आज (१० ऑगस्ट रोजी )सकाळी अचानक अजय चौबे यांना श्वास घेण्याचा त्रास जाणवू लागला होता. त्यामुळे पोलिसांनी त्यांना ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयात दाखल केले होते. मात्र दुपारपर्यंत त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. हृदयविकाराच्या झटक्याने हा मृत्यू झाल्याचा अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे. मात्र अद्यापही शवविच्छेदन प्रक्रिया आणि इतर वैद्यकीय तपासणी केल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरू सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.
मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789